# Washim District Police

**Nature of Work** :- **Arresting Gangsters**

**Police Station** :- **Risod**

**Date of Good Work done** :- **29/11/2021**

**Brief of the work done :-**

पोलीस स्टेशन रिसोड येथे PS पथकाने दिनांक 26 नोव्हेंबर चे रात्री प्रभावी कोंबिंग ऑपरेशन राबविण्यात असून त्या दरम्यान दोन तलवार बाळगणारे चार आरोपीस अटक करण्यात आली आहे. असे धारदार व घातक शस्त्र अवैधरित्या बाळगणारे यांचे विषयी माहिती देणे बाबत आवाहन करण्यात येत आहे.

लोकमत

## दोन तलवारींसह चार आरोपींना अटक!

### रिसोड पोलिसांची कारवाई : कोम्बिंग मोहिमेस यश

लोकमत न्यूज नेटवर्क

रिसोड : येथील पोलिसांनी २६ आणि २७ नोव्हेंबर रोजी कोम्बिंग मोहीम राबवून दोन तलवारींसह चार आरोपींना अटक केली. यासह इतरही विविध स्वरूपाच्या कारवाया करून आरोपींना जेरबंद करण्यात यश मिळविले.

प्राप्त माहितीनुसार, रिसोडचे ठाणेदार सारंग नवलकार, सहायक पोलीस निरीक्षक गवई, सुबनावळ, पोलीस उपनिरीक्षक मुंढे, सुरगडे, गव्हाणे, बांगर, पाटील आदिंनी कोम्बिंग गस्तच्या विशेष मोहिमेत सहभाग नोंदवून कलम ३२३, ३२४, ५०४, ५०६ भादंवि सहकलम ४, २५ आर्म ॲक्टमधील आरोपी समाधान बंडू वाठोरे, नागेश समाधान वाठोरे, राजशेखर कोंडुजी वाठोरे आणि गजानन बबन राजगुरे या चार आरोपींना गुन्ह्यात वापरलेल्या दोन तलवारींसह अटक केली.

यासह कोम्बिंग गस्तीदरम्यान गावठी हातभट्टी दारू अड्ड्यावर धाड टाकून २,२०० रुपये किमतीची दारू जप्त करण्यात आली. आरोपींना त्यांच्या राहत्या घरातून ताब्यात घेण्यात आले.



रिसोड शहरात व ग्रामीण भागात राहात असलेले निगराणी बदमाश फरार आरोपी, आर्म ॲक्टमधील गुन्हेगार, जातीय दंगलीतील गुन्हेगारांच्या राहत्या घराची झडती घेण्यात आली.

हिंगोली ते रिसोड रस्त्यावर नाकाबंदी करुन १३ संशयित वाहनांची तपासणी करण्यात आली.

Hello Washim
Page No. 4 Nov 29, 2021
Powered by: erelego.com